**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री किसान सम्मान निधीचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा, देशातल्या सुमारे साडे ९ कोटी शेतकऱ्यांना लाभ

- वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या नीट युजी फेरपरीक्षेसाठी यंत्रणा सज्ज

- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उद्या विविध कार्यक्रमांचं आयोजन

- लेबनॉनमध्ये सुरू असलेल्या इस्त्राइलच्या हल्ल्यामुळं इराणकडून होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद

आणि

- एफ आय एच महिला हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत उद्या भारताचा सामना न्यूझीलंडसोबत

**<><><><><>**

प्रधानमंत्री  किसान सन्मान निधीचा २३ वा हप्ता आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पश्चिम बंगालमधल्या हुगळी जिल्ह्यात तारकेश्वर इथून वितरित करण्यात आला. प्रधानमंत्री तारकेश्वर इथं पश्चिमबंगा दिवस सोहळ्यात सहभागी झाले होते, यावेळी त्यांनी ९ कोटी ४४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण १८ हजार ८८० कोटी रुपयांची रक्कम हस्तांतरित केली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी रेल्वे, शेती, ग्रामीण विकास, मत्स्यव्यवसाय आणि पशुसंवर्धन संबंधी अनेक विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली.

ही केवळ आर्थिक मदत नाही तर शेतकऱ्यांच्या मेहनत, समर्पण आणि योगदानाचा गौरव आहे, असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत राज्यातल्या ९० लाख ८५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे १ हजार ८१७ कोटी रुपये रक्कम जमा केल्याचं कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. यामुळं खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना मोठा दिलासा  मिळाला आहे, असं भरणे बातमीदारांशी बोलताना म्हणाले.

**<><><><><>**

आदिवासी समुदाय देशाच्या विकासाच्या प्रवासात महत्त्वाची भूमिका निभावत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ओदिशामधे मोहन चरण मांझी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला दोन वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त रायरंगपूर इथं आयोजित कार्याक्रमात ते आज बोलत होते. यावेळी प्रधानमंत्र्यांनी ४७ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या मूळ गावी मयूरभंज जिल्ह्यात पहाडपूर इथं भेट दिली.

**<><><><><>**

भारतीयांचं सामर्थ्य, समृद्धी, स्वाभिमान आणि आत्मविश्वास वाढवत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बारा वर्षांच्या कार्यकाळात भारत आत्मनिर्भर होण्यासाठी प्रेरित केल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. केंद्र सरकारच्या अनेक योजनांचा तपशील गोयल यांनी यावेळी मांडला.

**<><><><><>**

गणपतीपुळ्याजवळ समुद्रात आज ५ जण बुडाले त्यातल्या एकाचा मृतदेह हाती लागला आहे. तटरक्षक दल, मच्छीमार बोटी आणि पोलीसांचं पथक इतरांना शोधण्याचं काम करत आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या पैठण तालुक्यातल्या बिडकीनमधले १९ तरुण गणपतीपुळ्याच्या समुद्रात आज सकाळी पोहण्यासाठी उतरले होते.

**<><><><><>**

परभणी जिल्ह्यातल्या यशवाडी इथं हनुमान मंदिराचं निर्माणकार्य सुरू असताना सभा मंडपाचा भाग कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला असून १६ जण जखमी झाले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेतील मृतांना श्रद्धांजली अर्पण केली. राज्य सरकारनं मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

नीट यूजी २०२६ फेरपरीक्षा उद्या होणार असून याची पूर्वतयारी म्हणून आज एनटीए नं देशभरात मॉक ड्रील आयोजित केलं होतं. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत व्हावी यासाठीच्या तयारीचा हा भाग होता. नीट यूजी फेरपरीक्षेच्या तयारीविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**------------व्हीसी---------------**

*(उद्या होणाऱ्या नीट यूजी फेरपरीक्षेसाठीची तयारी पूर्ण झाल्याचं एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. देशातल्या ५५१ आणि परदेशातल्या १४ शहरांमधे ही परीक्षा होणार आहे. २२ लाख ७९ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी ही परीक्षा देणार असल्याचं एनटीएनं सांगितलं. परीक्षा पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात व्हावी यासाठी पोलीस, प्रशासकीय कर्मचारी, निरीक्षक आदी दोन लाख कर्मचारी देशभरातल्या परीक्षा केंद्रावर तैनात करण्यात आले आहेत. तसंच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत, विद्यार्थ्यांची ओळख पटवण्यासाठी आधार कार्ड आधारित बायोमेट्रिक बसवले आहेत, प्रश्नपत्रिका तसंच परीक्षेच्या इतर साहित्याची ने आण करण्यासाठी जीपीएस बसवलेल्या पोलिसांच्या वाहनांची सोय करण्यात आल्याचंही एनटीएने सांगितलं. परीक्षा केंद्र असलेल्या जिल्ह्यांमधे कठोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षेवर देखरेख करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात दंडाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसंच परीक्षा केंद्राच्या दोनशे मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ नुसार कठोर प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. अनेक जिल्ह्यांमधे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी प्रशासनातर्फे वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.*

*नीट यूजी फेरपरीक्षा उद्या दुपारी २ ते सव्वा पाच दरम्यान होईल. यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर सकाळी अकरा ते साडे अकराच्या सुमारास हजर व्हावं, असं एनटीएने सांगितलं आहे.)*

**<><><><><>**

'निरामय वार्धक्यासाठी योग' या संकल्पनेसह १२वा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' उद्या जगभरात साजरा होणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(देशातल्या प्रमुख शंभर ठिकाणी सांस्कृतिक मंत्रालयाद्वारे विशेष योग कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे. मुंबईसह देशातल्या बारा मुख्य शहरांमध्येही मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून २१० पेक्षा अधिक भारतीय दूतावासांसह जगभरात सुमारे अडीच हजार ठिकाणी उद्या 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या मध्य प्रदेशात जबलपूर इथं आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. योगदिनाचा मुख्य कार्यक्रम उद्या कोलकात्याच्या*

*ऐतिहासिक रेड रोडवर होणार असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण सकाळी पाच वाजल्यापासून आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. त्यामुळे पुणे तसंच छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून प्रसारित होणारं 'प्रादेशिक बातमीपत्र' या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणानंतर प्रसारित करण्यात येईल. राज्यातही विविध ठिकाणी योगदिनानिमित्त कार्यक्रम होणार आहेत.)*

**<><><><><>**

होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद करण्यात आल्याचे इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने आज जाहीर केलं. लेबनॉनवरील इस्रायलच्या सुरू असलेल्या लष्करी कारवाया आणि प्रामाणिकपणे आपल्या वचनांचे पालन करताना अमेरिकेला अपयश आल्याने हा निर्णय घेतल्याचे इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने म्हटले आहे. ही कथित आक्रमक कारवाई सुरू राहिल्यास पुढील उपाययोजनांचीही तयारी करण्यात आल्याचा इशारा कमांडने सरकारी वाहिन्यांद्वारे दिला आहे.

दरम्यान, दक्षिण लेबनॉनमध्ये इस्रायलच्या हवाई हल्ल्यांमध्ये किमान १६ जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये दोन लहान मुलांचाही समावेश आहे.

**<><><><><>**

न्यूझीलंडमध्ये ऑकलंड इथं सुरू असलेल्या एफ आय एच महिला हॉकी स्पर्धेत आज भारतानं चिलीचा ६ विरुद्ध ० गोलनं एकतर्फी पराभव करत या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची लढत यजमान न्यूझीलंडच्या संघाबरोबर होणार आहे. भारतातर्फे नवनीत कौर आणि दिपिकानं प्रत्येकी दोन तर नेहा आणि ऋतुजा पिसाळनं प्रत्येकी एक गोल झळकावला. भारताची गोलरक्षक सवितानं उत्तम कामगिरी करत भारताचा बचाव अभेद्य ठेवला.

यजमान न्यूझीलंडनं अमेरिकेविरुद्ध नियमित वेळेत १-१ अशी गोलबरोबरी साधल्यानंतर शूट ऑफ मध्ये ४ विरुद्ध १ गोलनं विजय साकारत अंतिम फेरीत प्रवेश केला.

**<><><><><>**

अफगाणिस्तानविरुद्धची एकदिवसीय क्रिकेट मालिका भारतानं आज ३-० अशी जिंकली. चेन्नईत झालेल्या शेवटच्या सामन्यात अफगाणिस्ताननं दिलेलं २१९ धावांचं आव्हान भारतानं केवळ २८ षटकं आणि ४ चेंडूत एक गडी गमावत पार केलं. भारताचे

सलामीवीर यशस्वी जयस्वालनं नाबाद ११० तर रोहित शर्मानं ७९ धावा केल्या. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या अफगाणिस्तानचे ५ गडी भारताच्या प्रसिद्ध कृष्णानं केवळ २३ धावात बाद केले.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडे दहा वाजता नेदर्लंड्सचा सामना स्वीडन बरोबर होणार आहे. अमेरिकेत ह्युस्टन इथं ही लढत होत आहे. आज झालेल्या दुसऱ्या सामन्यात ब्राझीलनं हैतीवर ३ विरुद्ध ० गोलनं विजय मिळवला.

**//<><><><><>//**